दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ३०७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, बुधवार, दि.१८ जून २०२५




## नागपुरात कंपनीत मोठा स्फोट, उकळते पाणी कामगारांच्या अंगावर



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील भीलगावजवळील खैरी येथील 'अंकित पल्प्स ॲण्ड बोर्ड्स मायक्रोक्रिस्टलाइन सेल्युलोज' या कंपनीत मंगळवारी सकाळी भीषण स्फोट झाला. या स्फोटात सुधीर कालबांडे (रा. कांद्री, कन्हान) या कामगाराचा मृत्यू झाला. तर ६ कामगार गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, जखमींवर कामठीच्या सिटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही कंपनी फार्मास्युटिकल एक्ससिपियंट्स आणि अन्नातील योजक यांचे उत्पादन आणि वितरण करणारी एक औद्योगिक संस्था आहे. सकाळी ९ वाजता कंपनीच्या 'डी-एक्शन सेक्शन' मध्ये ही दुर्घटना घडली.

प्राथमिक माहितीनुसार, कामगार रिॲक्टरवर काम करत असताना अचानक विस्फोट झाला आणि त्याम धून उकळते पाणी कामगारांच्या अंगावर पडले. त्यामुळे गंभीर भाजल्यामुळे एका कामगाराचा मृत्यू झाला तर इतर सहा जण जखमी झाले.

जखमी झालेल्यांमध्ये दिनेश टेबूरणे, मंगेश राऊत, युनुस खान, स्वप्नदीप वैद्य, आशिष वाढगुळे यांचा समावेश आहे. यापैकी चार जणांची प्रकृती अत्यवस्थ असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. घटनास्थळावर तत्काळ मदत कार्य सुरू करण्यात आले. जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त निकेतन कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच लेबर इन्स्पेक्टर आणि तहसीलदारांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. पोलीस विभागाने परिसर सील केला असून, घटनेची सखोल चौकशी न्यू कामठी पोलीस करीत आहेत. दरम्यान, स्फोटाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

कंपनी प्रशासनाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही घटना अचानक झालेल्या यांत्रिक बिघाडामुळे घडली असावी. मात्र कामगार संघटनांनी सुरक्षा उपाययोजनांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत कंपनीकडून उत्तरदायित्वाची मागणी केली आहे. ही घटना औद्योगिक सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर मानली जात असून प्रशासनाने तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत. कामगारांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांची तपासणी करण्यात येणार असून दोषी ठरल्यास कंपनीवर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. सध्या कंपनीतील उत्पादन कार्य काही काळासाठी बंद ठेवण्यात आले आहे. या दुर्घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कामगारांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

## नाशिक शहर, पुणे ग्रामीण यांची मुलींमध्ये...
## तर उस्मानाबाद, परभणी यांची मुलांच्या विभागात उपउपांत्य फेरीत धडक





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, पुणे :** नाशिक शहर, पुणे ग्रामीण यांने मुलींमध्ये, तर उस्मानाबाद, परभणी यांनी मुलांमध्ये १ल्या आदित्य चषक राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या उपउपांत्य फेरीत धडक दिली. महाराष्ट्र राज्य व पुणे जिल्हा कबड्डी असो.च्या मान्यतेने शिवशक्ती महिला संघाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. पुणे येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात मॅट वर झालेल्या पहिल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात नाशिक शहरने पूर्वार्धातील १८-२४ अशा ६ गुणांच्या पिछाडीवरून मुंबई उपनगर पूर्वचा कडवा प्रतिकार ४३-३८ असा मोडून काढला. पूर्वार्धात चाचपडत खेळणाऱ्या नाशिककराना उत्तरार्धात सूर सापडला. विदिशा सोनार, रिया खाडे यांनी शेवटच्या ५मिनिटात उपनगर वर लोण देत आघाडी घेतली. ती त्यांनी टिकवली. उपनगर कडून सेरेना म्हसकर, आस्था सिंग यांचा पूर्वार्धातील जोश उत्तरार्धात थोडा कमी पडला. शेवटच्या काही मिनिटात लोण पडल्याने उपनगरला त्यातून सावरायला वेळ मिळाला नाही.

नाशिकच्या मुलींची आगेकूच सुरू असताना मुलांना मात्र आपला गाशा गुंडाळावा लागला. उस्मानाबादने नाशिक शहरचा प्रतिकार ४६-३३ असा मोडून काढला. उस्मानाबादच्या विश्वजित सुपेकर, स्वराज मुळे, सुजय कुटे यांनी चतुरस्त्र खेळ करीत सामन्यावर आपले वर्चस्व राखले. ते शेवट पर्यंत कायम राखले. विश्रांतीला २२-१५ अशी त्यांच्याकडे आघाडी होती. नाशिकच्या सिद्धांत कनक, कार्तिक कोळसे यांनी बऱ्यापैकी लढत दिली. मुलींच्या दुसऱ्या सामन्यात पुणे ग्रामीणने साताऱ्याला ४०-१५ असे सहज नमविले. पहिला लोण देत पुणे ग्रामीणने मध्यांतराला १८-०६ अशी भक्कम आघाडी घेतली. मध्यांतरा नंतर आपला खेळ अधिक गतिमान करीत २ लोण देत सामना एकतर्फी केला. सानिका वाकसे, वर्षा बनसोडे यांच्या धारदार चढाया त्यांना आदिती भोसलेची मिळालेली पकडीची साथ या मुळे उस्मानाबादला हा विजय सोपा गेला. साताराची ईश्वरी किंजले चमकली. एकीकडे पुणे ग्रामीणच्या मुली उपांत्यपूर्व फेरी दाखल होत असताना मुलांच्या संघाला मात्र पराभवाला सामोरी जावे लागले. परभणीने पुणे ग्रामीणला ५०-२५ असे सहज नमविले. दोन्ही डावात २-२ लोण देत परभणीने गुणांचे अर्धशतक गाठले. पहिल्या डावात २८-११ अशी परभणीकडे आघाडी होती. किशोर जगताप, यश चव्हाण, नारायण शिंदे यांच्या चढाई पकडीच्या सर्वांगसुंदर खेळाला परभणीच्या विजयाचे श्रेय जाते. आदित्य भोसले, वैभव मुळे पुण्याकडून बरे खेळले.

मुलींच्या सामन्यात जालना संघाने नंदुरबार संघावर ४२-२१ मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला जालना संघाकडे २२-१०अशी आघाडी होती. जालन्याच्या मोनिका पवार व वैष्णी शिवतरे यांनी सुरेख चढाया केल्या. राणी भुजंग हिने पकडी केल्या. नंदुरबारच्या समिक्षा पाटील निकिता यादव यांनी चांगल्या चढाय़ा केल्या तर ज्योर्तीमयी शिंदे हिने पकडी केल्या.

परभणी संघाने कोल्हापूर संगावर ४३-३६ असा विजय मिळविला. मध्यंतराला परभणी कडे २८-११ अशी आघाडी होती. परभणीच्या सोनाली नावकीकर, रागिनी दाहे यांनी जोरदार चढाया केल्या तर प्रतिक्षा बाबर हिने पकडी केल्या. कोल्हापूरच्या प्रतिक्षा गुरव व सायली कस्तुरे यांनी सुरेख चढाया केल्या. श्रुतिका खोत हिने पकडी केल्या.

## लेखी आश्वासनानंतर रविश रासकर यांचे उपोषण स्थगित...
## अवैध पार्किंग हटवण्यासाठी रविश रासकर यांनी केलेल्या उपोषणाला यश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** सुपा एम आयडीसी मधील रस्त्यावरील अवैद्य पार्किंग त्वरित हटविण्यात यावी या मागणीसाठी रविश रासकर यांनी सुपा पोलिस स्टेशनसमोर काल (दि.१६ जून) रोजी सकाळी रविश रासकर उपोषणाला बसले होते. अखेर रात्री लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

रविश रासकर यांनी सुपा जुनी एमआयडीसी आणि सुपा फेज २ एमआयडीसी मधील होत असलेल्या अवैध रस्त्यावरील होत असलेल्या अवैद्य पार्किंगमुळे येणाऱ्या जाणाऱ्या कामगारांना अडचणींचा सामना करावा लागत होता. प्रवाशांचे वारंवार अपघात वाढत चालले असल्याने. मनसे नेते रविश रासकर यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी



कार्यालय अहिल्यानगर, उपअभियता बांधकाम स्थापत्य विभाग नवनागापूर यांना वारंवार पत्रव्यवहार करूनही अवैद्य पार्किंगवर कुठलीही कारवाई होत नसल्याने रविश रासकर यांनी उपोषणाचा पवित्रा घेतला. आणि सुपा पोलिसांनी अवैद्य पार्किंगवर कारवाई चालू केली. पण त्या गाड्या रस्त्यावर कायमस्वरूपी पार्किंग करत असल्यामुळे कामगारांची अपघात वारंवार होतात त्यामुळे रस्त्यावरची पार्किंग कायमस्वरूपी बंद होऊन ती प्रत्येक कंपनीची पार्किंग प्रत्येक कंपनीमध्ये व्हावी . आणि कुठेतरी जागा घेऊन त्यांची पार्किंग ची सोय करावी. रविश रासकर यांनी सुपा पोलीस स्टेशनच्या समोर उपोषण पुकारले होते. आणि ते काल सकाळी उपोषणाला बसले आणि त्यानंतर उपोषणावर पोलिस पोलिस निरीक्षक रात्री लेखी आश्वासन देऊन केलेल्या कारवाईचे पत्र दिले. व केलेल्या कारवाईचे पत्र दिल्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले. कारवाईसाठी थोडा अवधी मागितला. रविश रासकर यांचे उपोषण पोलीस निरीक्षक दिवटे यांनी लिंबू पाणी देऊन उपोषण सोडण्यात आले. यावेळी अमोल धामणे, अविनाश पवार,प्रवीण दळवी, सरदार शेख प्रवीण दळवी आदी मनसे कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

## थोडक्यात

## कळव्यात महिलेची भर दिवसा हत्या...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१७, कळवा (ठाणे) :** ठाण्यातील कळवा नाका परिसरातून एका कामगार महिलेची भर दिवसा हत्या झाल्याने महिलांच्या सुरक्षेबाबातचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरनिवर आला आहे.शनिवारी सकाळी कामाला निघालेल्या एका कामगार महिलेची भर दिवसा रस्त्यात हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना ठाण्याजवळ कळवा नाका येथे घडली आहे. या घटनेमुळे काळव्यात एकच खळबळ उडाली असुन कळवा पोलिस हत्या करणाऱ्या आरोपीचा कसून शोध घेत आहेत. या घटनेमुळे परिसरात राहणाऱ्या महिलांमध्ये दहशत पसरली आहे.

कळवा पूर्वेतील सम्राट अशोक नगर परिसरात ही घटना घडली आहे. सकाळच्या वेळेस कामावर निघालेल्या एका महिला मजुराची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शांती सुरेश चव्हाण (वय अंदाजे ३७ वर्षे) या महिलेला अज्ञात व्यक्तीने क्रूरपणे ठार मारले. या घटनेमुळे संपूर्ण कळवा परिसरात भीतीचं आणि अस्वस्थतेचं वातावरण पसरले आहे.

सकाळच्या सुमारास शांती चव्हाण या घरातून नेहमीप्रमाणे मजुरीसाठी बाहेर पडल्या होत्या. मात्र, त्या कामावर पोहोचल्या नाहीत. दुपारी त्यांचा मृतदेह कळवा येथील एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आढळून आला.. त्यांच्या गळ्यात ओढणी आवळलेली होती आणि मानेवर व पोटावर धारदार शस्त्राने केलेले गंभीर वार स्पष्टपणे दिसून येत होते. या घटनेवरून हा पूर्वनियोजित खून असल्याचा पोलिसांना संशय आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच कळवा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दरम्यान, शांती चव्हाण यांची हत्या झाल्याची बातमी पसरताच कळवा नाका परिसरातील महिला नाका कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शांती चव्हाण यांना न्याय मिळावा यासाठी मोठ्या संख्येने महिला कामगार कळवा रुग्णालयात जमल्या होत्या.

पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, शक्य त्या सर्व दिशांनी तपासाची चक्रे फिरवली जात आहेत. शांती चव्हाण यांची कोणाशी वैयक्तिक वैर होती का? हेही तपासलं जात आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, कामावर जाणाऱ्या महिलांना पुरेशा सुरक्षा सुविधा मिळणे ही काळाची गरज आहे, असे मत स्थानिक महिलांनी व्यक्त केले आहे. या घटनेने संपूर्ण कळवा हादरले असून, पोलिसांकडून लवकरात लवकर आरोपीला अटक करून कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी कळव्यातील नागरिकांकडून होत आहे.

## टोरंट विद्युत कंपनीला ठाणे जिल्ह्यात अन्य पर्याय द्या !
### मनसे नेते राजू पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, डोंबिवली (ठाणे) :** मुंबईच्या धर्तीवर भिवंडी सह कल्याण ग्रामीण भागासाठी विद्युत कंपन्यांचा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. टोरंट कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात ग्राहकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. भिवंडीत उसळणारी जण आंदोलन आता कल्याण ग्रामीण भागात देखील उसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईच्या धर्तीवर भिवंडी सह दिवा आणि अन्य परिसरासाठी अन्य विद्युत कंपन्यांचे पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी राज्यचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

भिवंडी लोकसभेत विद्युत ग्राहकांना हैराण केलेल्या टोरंट कंपनी विरोधात आता कल्याण लोकसभेतील ग्राहक देखील आक्रमक झाले आहेत. कल्याण लोकसभेतील दिवा विभागासह १४ गावांमध्ये टोरंट कंपनीकडून वीज पुरवठा केला जात आहे. मात्र या कंपनीच्या विरोधात नागरिकांनी आगमनाच्या पहिल्या दिवसापासून विरोध दर्शविला आहे. अवाढव्य देणारे वीजबिल, विद्युत ग्राहकांवर करण्यात येणाऱ्या पोलीस कारवाया यांसह अन्य कंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत.

कल्याण ग्रामीण भागातील दिवा,कळवा शहरासह परिसराला आणि १४ गावांना अनागोंदी कारभाराचा सर्वाधिक फटका बसू लागला आहे. त्यामुळे या कंपनीला पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. कल्याण ग्रामीण भागात टोरंट कंपनीने प्रवेश केल्यानंतर तत्कालीन आमदार राजू पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या विजयानंतर कंपनीच्या विरोधातील ठाण्यात असलेल्या भूमिपुत्रांच्या आंदोलना सहभाग घेतला होता. पाच वर्षांपासून ठाणे जिल्ह्यात टोरंट कंपनीला पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी मनसे नेते राजू पाटील हे करत आहे.

मात्र ठाकरे सरकार नंतर शिंदेच्या सरकारने देखील मनसेची ठाणे जिल्ह्यातील नागरिकांच्या महत्वाची मागणी मान्य केली नव्हती. त्यामुळे आता राज्याचे पालकत्व असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मनसेकडून हि मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आता विद्युत ग्राहक मनसे नेते राजू पाटील यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय निर्णय घेतात याकडे लक्ष देऊन राहिले आहेत.

**विद्युत ग्राहकांना होणारे फायदे !**

- ग्राहकांची समस्यां तातडीने सोडवण्यात येतील.
- कंपन्यांचे प्रत्येकाचे स्वतंत्र युनिट प्रमाणे दर असणार .
- कंपन्यांकडून नागरिकांना योग्य वागणूक दिली जाईल.
- पर्याय उपलब्ध झाल्याने दबाव शाही मधून मुक्तता होणार.

## संपादकीय



### एचटीबीटी कापूस बियाण्यांवरील बंदी

भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकाचा कापूस उत्पादक देश आहे. आपल्या पुढे फक्त चीन आहे. यावर्षी आपले कापसाचे उत्पादन होते ५८.४ लाख टन. जगाच्या तुलनेत हा वाटा तब्बल एक चतुर्थांश आहे. देशात सव्वा कोटी हेक्टरवर कापसाची लागवड होते. त्यातील ४२ लाखांहून अधिक हेक्टर क्षेत्र महाराष्ट्रात आहे. या वैभवी वर्तमानाला नख लागले आहे. राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी आत्म हत्येच्या वणव्यात होरपळतो आहे. कधीकाळी ढाक्याच्या मलमलीसाठी विदर्भातून कापूस जायचा, अशा लोककथा चर्चेत होत्या. सध्या त्याच पट्ट्यात प्रतिबंधित हर्बिसाइड टॉलरेंट बीटी (एचटीबीटी) कापूस बियाण्यांनी धुडगूस घातला आहे. दलालांच्या टोळ्यांना शेतकरी शरण गेले आहेत. सरकार असहाय्य अवस्थेत आहे.

मागील वर्षी २५ टक्के लागवड झालेल्या या बियाण्यांचा यंदाचा वाटा ४० टक्क्यांपेक्षा वाढेल. जैवविविधता धोक्यात येण्याच्या शक्यतेने काही पर्यावरणवादी सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढले. या बियाण्यांवर बंदी आली. आंध्र आणि तेलंगणपेक्षाही गुजरातेतून एचटीबीटीची रसद खुलेआम महाराष्ट्रात पोहचते. यातील गुप्त यंत्रणा थक्क करते. 'ना खाता, ना वही' पद्धतीची बिनबोभाट किमया म्हणजे एचटीबीटी व्यवहार. तसे म्हटले तर या वादाला दोन बाजू आहेत. एचटीबीटीबद्दलच्या नियमबाह्य प्रीतीत लाभाचा वाटा मोठा आहे. हे बियाणे तणनाशक असल्याने लागवडीचा खर्च घटतो. उत्पादन वाढते. एचटीबीटी बियाण्यांमुळे बोंडअळीचा प्रादुर्भाव टळतो असे म्हणतात. नेमका हा मोह शेतकऱ्यांना सोडवत नाही. जुने तुणतुणे सोडा आणि एचटीबीटीची वाट मोकळी करा, ही मागणी चक्क शेतकरी संघटनेने केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात बोलगार्ड-४ तंत्रज्ञान २०१७पासून उपयोगात आहे. आपल्याकडे अद्याप बोलगार्ड-३लाच मुभा नाही.

एका तथ्याकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. जगातील कोणत्याही उत्पादकाला उत्पादन खर्चाच्या आधारावर मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार आहे. अपवाद आहे तो फक्त शेतकरी. त्याच्या मालाचे भाव ठरवितात ते सरकार आणि व्यापारी. आता त्याला कुठले बियाणे पेरावे याचेही स्वातंत्र्य उरणार नसेल, तर त्याची मानसिक कोंडी समजून घ्यायला हवी. एचटीबीटीमुळे पर्यावरणावर, उत्पादनक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो. पारंपरिक बियाण्यांच्या जाती नष्ट होतात. पर्यावरण मंत्रालयाच्या अंतर्गत काम करणाऱ्या अनुवांशिक अभियांत्रिकी मूल्यांकन समितीचे (जीईएसी) या बियाण्याला समर्थन नाही, अशी उत्तरे शेतकऱ्याला दिली जातात. नव्या तंत्रज्ञानाला आपलेसे करण्यात सर्वांचे हित असल्याची शेतकऱ्यांचीही भावना आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार कपाशीत तण आणि अळीचा प्रादुर्भाव होत नाही. तसे झाले तर कीटकनाशके निर्माण करणाऱ्या कंपन्यांचा ताळेबंद विस्कटतो. कीडच लागणार नसेल तर, त्यांचे उत्पादन चालणार कसे? भावनांपेक्षा व्यवहार वरचढ ठरला तर, कृषिप्रधान देश वगैरे संकल्पना कशा धराशायी होतात त्याचे हे बोलके उदाहरण आहे. परवा यवतमाळ जिल्ह्यात चक्क पोलिस पाटलाने एचटीबीटीची पाकिटे घरी दडवली होती. त्याच्या अटकेने सखोल जाळे उलगडले. केंद्र आणि राज्याचा यावर पारदर्शी समन्वय हवा. गांभीर्य हवे. ठाम नियंत्रणदेखील. तसाही पीओपीवरील बंदीचा राज्यात झिम्मा सुरू आहे. प्लास्टिक बंदीचाही शिरस्ता तोच राहिला. पाच लाख रुपये दंड आणि पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा असतानाही अवैध प्लास्टिकचा संचार आहेच. ढिसाळ कारवाईचे अपघात पचवत 'बंदीग्रस्तां'ची लोकल सरकते आहे. प्रतिबंधित 'सीमी'च्या वऱ्हाडातील कारवाया अनेक वर्षे थांबल्या नव्हत्या. अकोल्यातून आठ कार्यकर्त्यांच्या मुसक्या आवळल्यावर यंत्रणा भानावर आली होती. 'सीमी'ची ही अवस्था आहे, तिथे बंदीचा कापूस उडाला तर लक्ष देणार कोण?

# शहरांतील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण हवेच !

सर्व सोयी सुविधांनी युक्त असलेली मुंबई समस्त हिंदुस्थानची आर्थिक राजधानी आहे. मुंबई शहराच्या बाबतीत असे म्हटले जाते कि इथे कोणीच उपाशी राहू शकत नाही. तुमची मेहेनत करण्याची सिद्धता असेल, तर तुमचे शिक्षण असो किंवा नसो रोजगाराच्या नानाविध संध्या तुम्हाला इथे सहज उपलब्ध होतात. इथे तुम्हाला लहानमोठे कोणतेही व्यवसाय करायचे असल्यास तुम्हाला भांडवल उपलब्ध करून देणारे अनेक मार्ग आहेत, इथे तुम्हाला राहण्यासाठी किंवा व्यवसायासाठी भाड्याने जागा उपलब्ध आहेत, रहदारीची मुबलक साधने उपलब्ध आहेत. शाळा, महाविद्यालये, बाजारहाट, रुग्णालये अगदी हाकेच्या अंतरावर आहेत. सश्रद्धांसाठी मंदिरे आणि प्रार्थनास्थळे जागोजागी आहेत, पर्यटनासाठी समुद्रकिनारे, प्राचीन ठिकाणे आहेत, मनोरंजनासाठी सिनेमा आणि नाट्यगृहे आहेत. तुमच्या खिशात पैसे आहेत तर इथे अशी कोणतीही वस्तू नाही जी विकत मिळत नाही. मुंबईत नशीब आजमावण्यासाठी आलेल्या आणि गडगंज श्रीमंत झालेल्यांची उदाहरणेही इथे पुष्कळ आहेत त्यामुळ प्रतिदिन देशभरातून लोंढेच्या लोंढे मुंबईकडे रोजगारासाठी धाव घेतात. बांगलादेशी घुसखोरांची तर इथे मोजदादच नाही. मुंबई नजीक असलेल्या ठाणे आणि नवी मुंबई शहराचीही काहीशी हीच स्थिती आहे. वीज, पाणी यांसारख्या अत्यावश्यक बाबींचा पुरवठा करणारे स्रोत, रस्ते, वाहतुकीची साधने मर्यादित असल्याने या वाढत्या लोकसंख्येचा भार त्यावर पडून इथे वर्षनुवर्षे राहणाऱ्या भूमी पुत्रांचे जीवन असह्य झाले आहे. मुंबईतील वाढत जाणारी गर्दी, वाढत्या वाहनांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वर्षातील बाराही महिने सुरु असलेल्या विकासकामांमुळे आणि टोलेजंग इमारतींच्या बांधकामांमुळे हवेत मोठ्या प्रमाणात पसरलेले धुळीकण आणि त्यामुळे होणारे वायुप्रदूषण, श्वसन विकार. जमिनीला आणि घरांना मिळणारे सोन्याचे भाव यामुळे मुंबईतील अनेक भूमिपुत्रांनी मुबईतील घरे विकून बदलापूर, कर्जत, वांगणी यांसारख्या ठिकाणी अल्प दारात घरे घेऊन संसार तर थाटले आहेत; मात्र यातील कर्त्या पुरुषांची (कमावत्या महिलांचीही) कार्यालये, कंपन्या मुंबईत असल्याने प्रतिदिन सकाळी मुंबईत येताना आणि सायंकाळी मुंबईतून घरी जाताना त्यांना जीवावर उदार होऊन रेल्वे प्रवास करावा लागतो आहे. लोकल रेल्वेसेवा ही तुलनेने स्वस्त आणि जलद असल्याने तसेच तिन्ही जिल्ह्यांत याचे जाळे पसरलेले असल्याने लोकांकडून प्रवासासाठी या मार्गालाच अधिक पसंती दिली जात आहे. गेल्या



काही वर्षांत लोकल रेल्वेवरील भार कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने नानाविध प्रयत्न केले आहेत. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने दोन गाड्यांतील कालावधी अल्प केला, लोकल गाड्यांची संख्या वाढवली, गाड्यांच्या फेऱ्या वाढवल्या, १२ डब्यांच्या लोकलगाड्या १५ डब्यांच्या केल्या, जलद मार्गाचे थांबे वाढवले; मात्र ज्या तुलनेत प्रवाशांची संख्या वाढते आहे त्या तुलनेने हे उपायसुद्धा निष्फळ ठरत आहेत. कार्यालयीन वेळेत रेल्वे गाड्या दुथडी भरून वाहत असतात. गुरांना कोंबावे तशी माणसे या गाड्यांतून कोंबून प्रवास करतात, कितीतरी जण जीव मुठीत घेऊन रेल्वेच्या दाराबाहेर लटकत प्रवास करतात ज्यामध्ये स्त्रियासुद्धा मोठ्या प्रमाणात असतात. मुंब्रा येथे घडलेला अपघात हा देशभर गाजला असला, तरी लोकल रेल्वेमार्गावर गर्दीच्या वेळेत प्रतिदिन कितीतरी जण धावत्या रेल्वे गाड्यांतून पडून मरण पावतात तर कित्येक जण कायमचे जायबंदी होतात. सध्या पावसाळा सुरु आहे. पावसाळ्यात रेल्वे डब्याच्या पायदानवर पाय ठेवून प्रवास करणारे प्रवासी अनेकदा पाय घसरून पडतात, गर्दीच्या वेळेत प्लॅटफॉर्मवर उतरतानाही बऱ्याचदा अपघात होतात. लोकल रेल्वेवर पडणारा भार कमी करण्यासाठी प्रशासन शहरी भागात मेट्रो रेल्वेचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र अनेक ठिकाणी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे ही कामे थांबलेली आहेत. ज्या ठिकाणी कामे सुरु आहेत, तीही अत्यंत संथगतीने सुरू आहेत. त्यामुळे जेव्हा केव्हा त्या ठिकाणी मेट्रोसेवा सुरु होईल तोपर्यंत लोकसंख्या एव्हढी वाढलेली असेल कि त्या तुलनेत मेट्रोही अपुरी पडावी. मुंबईत अनेक ठिकाणी रस्त्यांचे रुंदीकरण सुरु आहे, मोठमोठे उड्डाणपूल तयार करण्यात आले आहेत, भुयारी मेट्रो मार्गही बनवण्यात आले आहेत. मुंबईत समुद्राखालून कोस्टल रोड सुरु झाले आहेत'; मात्र ज्या तुलनेत आज शहरातील लोकसंख्या वाढतआहे त्या तुलनेत हे सर्वच मार्ग अपुरे पडून सर्वांचा भार पुन्हा लोकल रेल्वे गाड्यांवरच पडत आहे. लोकल ट्रेन वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी खासगी कंपन्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा बदलण्याचे आणि शक्य त्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम धोरण अवलंबण्याचे आवाहन केले आहे; मात्र या आवाहनाला खासगी कंपन्यांकडून हवा तसा प्रतिसादही मिळताना दिसत नाही. वर्तमानात शहरातील लोकल गाड्यांची वाढती गर्दी पाहिल्यावर आज जी मुले शालेय शिक्षण घेत आहेत ती जेव्हा कमावती होतील तेव्हा त्यांचा लोकल गाड्यांचा प्रवास किती भयावह असेल याची कल्पनाही करवत नाही. लोकल ट्रेनचे अपघात कमी करण्यासाठी सर्व लोकल गाड्या वातानुकलीत आणि स्वयंचलित उघड झाप करणाऱ्या दरवाज्यांच्या करणे नक्कीच सोपे नाही त्यासाठी भरपूर सिद्धता करावी लागेल, ती नाही केली तर रोगापेक्षा इलाज भयंकर होऊ शकतो.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई यांसारख्या शहरातील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी उपयोयोजना आखणे आणि त्याची कठोरपणे अंमलबजावणी करणे आज नितांत गरजेचे आहे. दुसरी बाब म्हणजे ज्या सोयी सुविधा आणि रोजगाराच्या संधी या विकसित आणि विकसनशील शहरांत आहेत, त्या देशातील अन्य शहरांत का निर्माण होऊ शकत नाहीत याचाही विचार प्रत्येक राज्याने करणे आवश्यक आहे. राज्यातील बेरोजगारी कमी करायची असेल तर प्रत्येक राज्यांतील प्रत्येक शहरांत मुंबईच्या तोडीच्या सोयी सुविधा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात. आपल्या राज्यातील एकही तरुण आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या पोटाची भूक भागवण्यासाठी राज्याच्या बाहेर जाणार नाही याची काळजी प्रत्येक राज्यातील शासनाने घ्यायला हवी. कायद्यानुसार देशात कोणीही कोणत्याही राज्यात किंवा शहरात चाकरी अथवा व्यवसाय करू शकतो हे ऐकायला जरी चांगले वाटत असले, तरी मूळ मुंबईकरांना आज काय हाल सोसावे लागत आहेत हे मुंबईकरांनाच विचारावे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## पाडळी दर्या घाटतील रस्ता खचल्याने धोकादायक स्थिती... भीषण अपघात होऊन जीवित हानी होण्याची शक्यता

**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :**

पारनेर - पाडळी दर्याच्या घाटात दोन ठिकाणी रस्ता वाहिल्याने वाहतूकीला धोका निर्माण झाला आहे. भीषण अपघात होऊन मोठी जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. घाटाखालील गावांना पठारावरील गावांना जोडणारा पाडळी दर्या चा हा घाट खूप महत्त्व पूर्ण असून या मार्गाने दररोज मोठी वाहतूक होत असते. या मार्गाने एस टी बस, खाजगी दुचाकी, चारचाकी व इतर वाहनांची मोठी वर्दळ असते, त्यामुळे चालकांना अतिशय खबरदारी घ्यावी लागते, अन्यथा कोणत्याही क्षणी वाहन व त्यातील प्रवासी खाली दरीत कोसळू शकते. कित्येक वर्षे या घाटाची डागडुजी वा



दुरुस्ती करण्यात आलेली नसून सध्या पडणाऱ्या पावसाने या घाटातील दोन ठिकाणी डांबरी रस्ता खचल्याने मोठे भगदाड पडले आहे. पाडळी दर्या येथील सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिक गिताराम नारायण खोसे व इतरांनी वाहन धारक, चालकांच्या लक्षात येण्याकरिता या ठिकाणी संरक्षण दगड लावले आहेत, हा प्रकारे जणू वाहन चालकांना इशारा देण्याचाच प्रयत्न केला आहे, जेणे करून रस्त्याची परिस्थिती लक्षात येवून संभाव्य अपघात टळावा.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या पाडळी दर्या घाटाची त्वरीत संपूर्ण दुरुस्ती करून भविष्यातील संभाव्य व भीषण अपघात टाळावा व घाटात ठिकठिकाणी संरक्षक कठडे, दिशा दर्शक फलक लावावेत, जेणेकरून भविष्यात होणारा, भीषण अपघात टळला जाईल, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांनी केले आहे.

### अंतर्गत...

कळेनं कुणासोबत
करावी साथ संगत
पक्षबलाढ्य तरीही
धोरणे ती विसंगत

जमवून घे सूरताल
मैफिलीत येई रंगत
जडपोचले तळाशी
हलके राही तरंगत

विभिन्न विचारधारा
मुळी शोभेना पंगत
भल्यांचेबाजूस बसे
दारूडेशेजारझिंगत

आधार द्यावा कसा
अजून आहेत रांगत
लंगडे सगळे कंपूत
कशी लावली शर्यत

म्हणे विश्वासठेवावा
कैकदा करे फसगत
चक्रव्यूहांत अडकवे
कला त्यांना अवगत

प्रत्येकप्रश्नांला ठरले
उत्तरे असे मुखोत्गत
अपेक्षित बाह्य मदत
विवादसरेना अंतर्गत


**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा य

ा गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले.

एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलिम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा



धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता.

याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते.

या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बंडगार्डन रोड खड्ड्यांचे साम्राज्य – अपघातांना निमंत्रण!



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१७, पुणे :** बंडगार्डन रोडवर पावसाची काहीच सरी झाल्यावर मुख्य रस्त्यांवर मोठम ोठे खड्डे तयार झाले आहेत. ही परिस्थिती ठेकेदारांच्या निकृष्ट दर्जाच्या कामांची पोलखोल करत आहे. महानगरपालिका याकडे दुर्लक्ष करत असून, या खड्ड्यांमुळे वारंवार अपघात होत आहेत. विशेष म्हणजे परिसरात शाळा असल्याने विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आहे.

एका अपघातात एखाद्याचा जीव गेला तर जबाबदारी कोण घेणार? रस्त्यावरून वाहने धड चालवणे अशक्य झाले आहे. ठेकेदारांवर कोणतीही कार्यवाही होत नाही हे प्रशासनाच्या उदासीनतेचे प्रतीक आहे.

महानगरपालिका झोपेत आहे की काय? की ठेकेदारांना अभय दिलं जातंय? वर्षानुवर्षे हेच चित्र दिसतेय – ठेकेदार पैसे लाटतात, रस्ते धोकादायक होतात, आणि प्रशासन निव्वळ आश्वासने देत राहतं! अजून किती अपघातांची वाट बघणार? नागरीकांच्या जीवाशी खेळणाऱ्या दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करावा, हीच जनतेची आक्रमक मागणी आहे

## आयर्नमॅनची आफ्रिकेच्या अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये दुसऱ्यांदा यशस्वी धाव

### शहापूरच्या वनअधिका-याचे शौर्य जिद्द व चिकाटीचे कौतुक




**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१७, शहापूर (ठाणे) :** जगातील सर्वात कठीण अल्ट्रा मॅराथॉन कॉमरेड्स मॅराथॉन अंतर ९० कि.मी. साऊथ आफ्रिका या देशातील डर्बन ते पीटर्समार्गबर्ग शहरांमध्ये घेण्यात येते.या वर्षी सदर कॉमरेड मॅराथॉन स्पर्धा दिनांक ८ जून रोजी पार पडली. ही स्पर्धा सलग दोन वर्ष यशस्वीरित्या पूर्ण करून ठाणे वनवृत्तातील शहापूर वनविभागात वनपरिक्षेत्र अधिकारी वाशाळा या पदावर कार्यरत असलेले विशाल विठ्ठल गोदडे यांनी नवा विक्रम नोंदविला आहे. असा विक्रम करणारे ते भारतीय वनविभागातील पहिलेच अधिकारी ठरले आहेत.

सदरची स्पर्धा त्यांनी ११ तास ३२ मिनिटे एवढया वेळात पुर्ण केली आहे. तसेच गेल्या वर्षी ९ जून २०२४ रोजी ही स्पर्धा त्यांनी ११ तास ३५ मिनिटे एवढया वेळात पुर्ण केली होती. त्यासाठी त्याना विशेष पदक प्राप्त झाले आहे.

यापुर्वी मलेशिया या देशातील लंकावी या ठिकाणी दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या जगातील सर्वात कठीण एक दिवसीय आयर्नमॅन या स्पर्धेत सहभागी होवुन सदर स्पर्धा १५ तास ४३ मिनिटांत पूर्ण करुन पहिल्याच प्रयत्नातआयर्नमॅनहा जागतिक बहुमानाचा किताब देखील त्यांना मिळविलेला आहे.सदरचा किताब मिळवणारे भारतीय वन विभागातील ते पहिलेच अधिकारी आहेत.

त्यानंतर दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी जगातील समुद्रसपाटीपासुन सर्वात उंच ठिकाणी होणारी लडाख मॅराथॉन देखील त्यांनी यशस्वीरित्या त्यांनी पुर्ण केलेली आहे. हे धवळ यश प्राप्त करण्यासाठी त्यांची पत्नी पुजा गोदडे यांची विशेष साथ लाभली. त्याचप्रमाणे कोच अमित कुमार यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. असे गोदडे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.

वनविभागात वनपरिक्षेत्र अधिकारी असलेले तसेच शहापूर तालुक्यातील तानसा धरणाच्या पायथ्याशी असलेल्या भावसे गावचे भूमिपुत्र विशाल गोदडे यांनी क्रिडा क्षेत्रात ज्याप्रमाणे उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे अगदी त्याचप्रमाणे त्यांनी वन विभागात देखील आपले शासकीय कर्तव्य चौक बजावून वनसंरक्षण व संवर्धन, जल व मृद संधारण, रोपवाटीका कामे, वनांतील इमारत बांधकामे इत्यादी स्वरुपाची अनेक नाविण्यपुर्ण कामे केलेली आहेत.

## आश्रम शाळा तवा येथे शाळा प्रवेश उत्सहात... विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत...



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१७, डहाणू (पालघर) :** नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहात आणि आनंदात व्हावी, यासाठी डहाणू आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तवा येथे शाळा प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या उत्सवात विद्यार्थ्यांचे फुलांनी स्वागत करून शाळेच्या नव्या पर्वाची सुरुवात करण्यात आली. विशेष म्हणजे, इयत्ता १० वी आणि १२ वीमध्ये यशस्वीरीत्या उत्तीर्ण झालेल्या आणि प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा शाळेकडून गौरव करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आत्मविश्वास निर्माण झाला असून, इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले.

कार्यक्रमावेळी आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रतिनिधी वाल्मिक पाटील यांनी उपस्थितांना 'न्यूक्लियस बजेट', 'धरती बिरसा मुंडा योजना' यांसह आदिवासी समाजाच्या विकासासाठी सुरू असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

शाळेचे मुख्याध्यापक संतोष सागर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण करत अभ्यास, शिस्त, आणि संस्कार यांचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय ठरवून आत्मविश्वासाने पुढे जात राहावे, असा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या समारोपापूर्वी शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे, या हेतूने शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या लता कवठे, ग्रामपंचायत सदस्या सरिता मेढा, सदस्य जयेश मेरे, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबाबत आत्मीयता निर्माण झाली असून, शाळा हे शिक्षणाबरोबरच संस्कारांचेही केंद्र आहे, हे अधोरेखित झाले.

# आधुनिक शेती व प्रक्रिया उद्योगसह कौशल्यविकासाच्या नव्या वाटा

## -: जिल्ह्याच्या युवकांसाठी महत्त्वपूर्ण बैठक :-



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१७, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यात 'सॅटेलाईट स्किल सेंटर' करण्याच्या प्रस्तावास पुणे येथील सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठाने मान्यता दिली आहे. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीत धाराशिव जिल्ह्यातील युवकांसाठी आधुनिक शेती व प्रक्रिया उद्योग सह उद्योगानुकूल प्रशिक्षण, जागतिक दर्जाचे कौशल्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने रोजगाराच्या संधी यानिमित्ताने उपलब्ध होणार असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ स्वाती मुझुमदार,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रकाश अहिरराव,तहसीलदार अरविंद बोळंगे,मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांच्यासह

सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठाच्या विविध विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांशी व्यापक चर्चा करण्यात आली.

धाराशिव जिल्ह्यात 'सॅटेलाईट स्किल सेंटर' सुरू करण्याच्या प्रस्तावावर विशेष भर देण्यात आला. या उपक्रमांतर्गत उद्योग, विद्यार्थी, स्थानिक लोकसंख्या आणि विविध घटकांसाठी व्यावसायिक आणि कौशल्यात्मक प्रशिक्षण देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे. जिल्ह्यातील युवकांना उद्योगानुकूल प्रशिक्षण, जागतिक दर्जाचं कौशल्य, शेती व प्रक्रिया उद्योग क्षेत्र तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुणे येथील सिम्बायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये ही उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती.

**टेक्निकल टेक्सटाईल साठी सहकार्य**

सिम्बायोसिसचे जगातील टेक्निकल टेक्स्टाईल क्षेत्रातील अनेक मोठ्या उद्योगां बरोबर संबंध असल्याने ते कौडगाव येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरू होत असलेल्या टेक्निकल टेक्सटाईल पार्क मधे गुंतवणूकदार आणण्यास देखील सहकार्य करणार असल्याचे या बैठकीत ठरले आहे.

**शेतीसाठी ड्रोन आणि एआय वापराचे प्रशिक्षण**

कृषी व आर्टिफिशियल इंटेलिजन्स या महत्वपूर्ण ज्ञानशाखाबाबतही बैठकीत निर्णय घेण्यात आला. आधुनिक शेतीसाठी शेतकऱ्यांसाठी ड्रोनचा वापर, अख अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अचूक मृदा विश्लेषण,पिकांना पाणी व तणांसाठी उपाययोजना ,अन्न प्रक्रिया अशा तंत्रज्ञानांवर आधारित प्रशिक्षणही आता आपल्या जिल्ह्यातच सिंबायोसिस मार्फत दिले जाणार आहे. तरुणांना व्यावसायिक दृष्टिकोनातून ड्रोन चालवणे आणि त्याद्वारे फोटोग्राफी व विश्लेषण कार्यपद्धती शिकवण्याचा अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे.

सिम्बायोसिस विद्यापीठाने जर्मनी सरकारसोबत कुशल मनुष्यबळ पुरवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत असून त्याअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरही मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील युवकांसाठी रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या होतील. स्थानिक गरजा लक्षात घेता सिम्बायोसिस युनिव्हर्सिटीच्या मार्गदर्शनाखाली सॅटेलाईट स्किल सेंटरचे स्वरूप निश्चित केले जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

यावेळी सिम्बायोसिसचे माजी विद्यार्थी आणि संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांनी तुळजापूर शहराच्या पुढील ५० वर्षांसाठी 'अर्बन प्लॅनिंग' करण्याचेही आश्वासन दिले. या नियोजनात शहराच्या विस्तार, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्थापन, पर्यावरणपूरक धोरणे आणि डिजिटल शहरासाठी आवश्यक बाबींचा समावेश असेल.

**युवकांसाठी नव्या युगाची सुरुवात : आमदार पाटील**

धाराशिव जिल्ह्याच्या विकासाचा कणा म्हणजे आपला युवक. सिम्बायोसिससारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेशी भागीदारी करून त्याला योग्य दिशा देण्याचा आपला प्रयत्न आहे. या माध्यमातून जिल्ह्याचा आर्थिक, सामाजिक व तांत्रिक विकास घडेल. ही बैठक एक सकारात्मक पाऊल ठरून धाराशिव जिल्ह्यातील युवकांसाठी नव्या रोजगाराची आणि सक्षम आर्थिक युगाची सुरुवात ठरेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## सिकलसेल दिनानिमित्त सिकलसेल जनजागृती पंधरवडा




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१७, ठाणे :** केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन मिशन अंतर्गत सन २०४५ पर्यंत सिकलसेल रोग निर्मूलनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार, दरवर्षी दि. १९ जून रोजी जागतिक सिकलसेल दिन साजरा केला जातो. यावर्षी ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विभागाशी समन्वय साधून आरोग्य विभाग जिल्हा परिषद ठाणे यांच्या मार्फत दि. १५ जून ते ३० जून २०२५ या कालावधीत सिकलसेल जनजागृती पंधरवडा राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गौतम राजू यांनी दिली.ही मोहीम जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या शासकीय आरोग्य संस्थामध्ये,प्रा.आ. केंद्र व उपकेंद्रांमध्ये प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. सिकलसेल हा आजार अनुवांशिक रक्तदोष असून यामध्ये लाल रक्तपेशींचा आकार विळ्यासारखा आकाराचा होतो. त्यामुळे पेशींची लवचिकता कमी होऊन रक्तप्रवाहात अडथळे निर्माण होतात. परिणामी सांधे दुखणे, थकवा, हिमोग्लोबिनची कमतरता, शरीर पिवळसर होणे, वारंवार संसर्ग होणे अशी लक्षणे दिसून येतात. या आजारावर कायमस्वरूपी उपचार उपलब्ध नसले तरी प्रतिबंधात्मक उपाय व योग्य काळजी घेतल्यास त्यावर नियंत्रण मिळवता येते. जनजागृती पंधरवड्यात सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये जनजागृती कार्यक्रम व तपासणी शिबिरे आयोजित करणे,लोकमाध्यमांतून समुपदेशन व सिकलसेल बाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविणे,

वय १२ ते १७ वयोगटातील शाळेत व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सिकलसेल आजार, त्याच्या संभाव्य धोके व प्रतिबंधात्मक उपाय याविषयी सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे.

## पालिकेने केली शाहीर कृष्णा पाटील उद्यानाची दुर्दशा !

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१७, जुईनगर (नवी मुंबई) :** शाहीर कृष्णा पाटील उद्यान सेक्टर २३ जुईनगर मध्ये हे एकमेव गार्डन असून फार पूर्वी पासून या ठिकाणी उकिरड्यागत अवस्था झाली होती. नगरसेविका तनुजा मढवी २०१५ मध्ये निवडून आल्यानंतर त्यांनी इतर नागरी कामांबरोबर या गार्डेनचेही काम करावयास विनंती अर्ज केले पण सदर कामास हिरवा कंदील काही केल्या मिळत नव्हता कारण ते काम अधिकाऱ्यांचे मते मोठे काम होते. या ठिकाणी दोन गाजेबो, पाथवे, लाल माती टाकणे, खेळणी बसवणे, हिरवळ लावणे या सारखी कामे होती पण अधिकारी खर्चामध्ये कपात करण्यात गुंग असल्यामुळे सदर कामास मंजुरी मिळत नव्हती. सरते शेवटी कामांची काटछाट करून ते काम मंजूर झाले व एक सुंदर उद्यान तयार झाले होते.

पण सुरुवातीला या ठिकाणी एक माळी तोही वयस्कर असल्यामुळे त्याला पाणी चालू असे पर्यंत पूर्ण झाडांस पाणी देणे शक्य होत नव्हते, परिणामी जी गार्डन सुंदर दिसत होती ती दिवसेंदिवस खराब दिसण्यास सुरुवात झाली. अधिकाऱ्यांना वेळोवेळी कळविले पण कोणीही माळी वाढविण्याचे मनावर घेतले नाही. आज जरी नवा ठेकेदार आला तरी त्याला ती सुंदरता पुन्हा आणता आली नाही.

आजच्या घडीला माळ्यांची संख्या वाढविली आहे परंतु त्याना गार्डन सुंदर ठेवण्याचे धडे कोणी देत नसावे. ठीक ठिकाणी झुडुपे लावलेली होती ती मरून गेली त्यामुळे ती एकसंगती दिसत नाही. हिरवळीची तर पूर्ण वाट लागलेली आहे. ठीक ठिकाणी उकिरडे आहेत. झुडुपांची वेळोवेळी छाटणी होत नाही. स्वच्छतेचा



अभाव देखील आहे. काही नागरिक सदर बाबतीत नाराजीच्या सुरात बोलत असतात. नागरिकांना चालण्यासाठी जो पाथ वे आहे त्याच्या दुरुस्तीच्या कामाचे टेंडर येऊन चार महिने झाले तरी अधिकारी ते काम करू देत नाहीत त्यामुळे नागरिकांना त्या तुटक्या फुटक्या पाथवे वरून चालणे मुश्किल होत आहे.

या ठिकाणी नियमा प्रमाणे सकाळी ५.३० वाजता गार्डन उघडायची असतात पण सकाळी आठ वाजता गार्डन उघडली जाते. माळी सकाळी येऊन लवकरच निघून जात असतो. या गार्डनला कोणी जबाबदार अधिकारी असता तर वाताहत झाली नसती.सदर शाहीर कृष्णा पाटील उद्यानाच्या निष्काळजी ठेकेदारा मुळे या उद्यानाची वाताहत झालेली आहे. हे उद्यान नागरिकांसाठी आहे की फक्त ठेकेदाराला बिल देण्यासाठी आहे हेच समजत नाहीं. सदर ठेकेदाराला काळ्या यादीत टाकणे गरजेचे आहे.

**तर अशा प्रकारे ज्या पालिकेने हे एकमेव शाहीर कृष्णा पाटील उद्यान सुंदर बनविले होते पण पालिकेनेच ते विद्रुप केले आहे. असे जुईनगरचे समाजसेवक श्रीधर मढवी यांनी दैनिक अक्षराजच्या पत्रकारास सांगितले आहे.**

## ई – नाम प्रणाली शेतकऱ्यांना फायद्याची : रंगनाथ कटरे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** केंद्र सरकारच्या नवीन धोरणानुसार राष्ट्रीय कृषी बाजार ( ई-नाम) या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा होणार असून शेतमालाच्या खरेदी- विक्री व्यवहारात पारदर्शकता येणार असल्याची माहिती कृषी मंत्रालय भारत सरकारचे नियुक्त मार्गदर्शक रंगनाथ कटरे यांनी दिली.

पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काल (दि.१६) बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी, व्यापारी, अडते,मापाडी व सर्व बाजार घटकांसाठी ई – नाम प्रणाली अंतर्गत मार्गदर्शन प्रशिक्षण संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती किसनराव रासकर होते. कटरे म्हणाले की, केंद्र सरकारच्या नवीन धोरणानुसार राष्ट्रीय कृषी बाजार म्हणजे ई –नाम या योजनेमध्ये पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश झाला आहे. शेतकऱ्यांनी ई– नाम प्रणाली मध्ये नाव नोंदणी करावी. असे आवाहन केले. त्यासाठी आपले आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत सादर करावी. ई– नाम ऍप डाऊनलोड करून ही शेतकऱ्यांना नाव नोंदणी करता येणार आहे. व्यापारी बांधवांनाही ई– नामद्वारे देशातील कोणत्याही बाजार पेठेत शेतमालाचे खरेदी विक्रीचे व्यवहार करता येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य बाजार भाव मिळणार असून त्यांची आर्थिक उन्नती होणार असल्याचेही ते म्हणाले. या वेळी उपसभापती किसनराव सुपेकर, संचालक अशोक कटारिया, अशोकराव सावंत, शंकरराव नगरे, संदिप सालके,चंदन भळगट, बाबासाहेब नऱ्हे, तुकाराम चव्हाण, संचालिका मेघा श्रीरंग रोकडे यांच्यासह शेतकरी व्यापारी, अडते, मापाडी, हमाल उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या मालाला कवडीमोल भाव; बियाणांचे भाव गगनाला

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१७, कुंडलवाडी (नांदेड) :** भाव वाढतील या आशेने अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन घरातच साठवून ठेवले आहेत. भाव काही वाढेनात. ४ हजार ५०० रुपयांच्या वर सरकेना. अशातच खरिप हंगामातील पेरणीसाठी ३ किलो सोयाबीन बियाणाला ४ ते ५ हजार रुपये मोजावे लागत आहेत. तर एक क्विंटलला ४ हजार भाव मिळतो. तुम्हीच सांगा काय शेतकऱ्यांवर वेळ आली अशा भावना व्यक्त करीत नाराजीचा सूर हवालदिल शेतकऱ्याच्या तोडून ऐकू येत आहे.



सोयाबीन उतारा एका बॅगला एकरी ६ ते ७ क्विंटल होतो. लागवड व इतर खर्च लावला तर शेतकऱ्यांना काहीच उरत नाही. एक तर पिकांचा उतारा कमी आणि उत्पादित मालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नाही. सोयाबीनच्या पिकापोटी सर्व खर्च २१ ते २३ हजार रुपये येतो आणि उत्पन्न २७ हजार रुपये मिळते. काय उरते तुम्हीच सांगा, असा सवाल करीत कसा काय शेतकरी वरी येईल ? असे शेतकरी बोलून दाखवत आहेत.

सोयाबीन पीक पावसाळ्यात अतिप्रमाणात पाऊस झाला तर कधी कधी शेतकऱ्यांच्या हातीच लागलेला नाही. अशा पेचप्रसंगात दुष्काळाचे गडद सावट शेतकऱ्यांवर उभे राहते. मग अशी परिस्थिती होते कि पिकली कि शेती नाही तर माती. अशावेळी शासनाकडून कोणतेही मदत मिळत नाही. शासनाने शेतमालाला चांगला भाव दिल्याशिवाय प्रगती होणार नाही, असे शेतकरी बोलू लागले आहेत. दिवसेंदिवस परिस्थिती कायम असल्याने कर्जाच्या खाईत शेतकरी ढककला जात आहे. सालगडी ठेवणे अवघड झाल्याने शेत मंजुराकडून कामे करुन घेतात. शेतमजुरीचे दर ही मनमानीपणे वाढले आहेत. शेतकरी, पेरणी, अंतरमशागती, यासाठी लहान ट्रॅक्टरचा वापर करतात. मात्र पेट्रोल, डिझेलचे भाव वाढल्याने मशागतीचे दरही वाढले आहेत. त्यामुळे शेती करणे अवघड झाले आहे. अनेकांनी शेती करणे सोडून दिले आहे.

एकरी सोयाबीन लागवडीच्या पोटी नागरणी - ३०००, रोटावेटर- २०००, पेरणी-१०००, बियाणाची बॅग-४००० रूपये, खत- २०००, फवारणी-५०००, सोयाबीन कापणी-४०००, मळणी यंत्रणा काढणी-२०००, असा एकुण २३,००० रुपये खर्च येतो. त्या मानाने उत्पन्न हाती पडण्यात नसल्याने शेतकऱ्यांची प्रगती होण्याऐवजी अधोगती होत आहे. खरीप पेरणीवेळी ३० किलोच्या सोयाबीन बॅगला ३८०० ते ४००० रुपये मोजावे लागत आहेत. परंतु, शेतकऱ्याच्या जवळ असलेल्या सोयाबीन प्रति क्विंटल फक्त ४००० चा भाव मिळतो. असा दुजाभाव का? असा सवाल शेतकऱ्यांतून उपस्थित केला जात आहे. शासनाने सोयाबीनचे दर वाढवावे,अशी मागणी शेतकऱ्यांतून केली जात आहे.

## आंदोलनकर्ते तहसीलदार कार्यालयात शेळ्या मेंढरांसह घुसले

### सरोदे कुटुंबियांचे तहसील कार्यालयासमोर आंदोलन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** सरोदे परिवार व चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद पवार व अन्याय निवारण समितीचे अध्यक्ष अरुण रोडे पाटील शेळ्या मेंढ्या घेऊन तहसील कार्यालयामध्ये न्यायासाठी घुसले. चिचोंडी पाटील येथील कौसाबाई मारुती सरोदे यांच्या मालकीच्या गट नंबर १०२६ मधील सातबारा वरून तत्कालीन तलाठी सर्कल यांना हाताशी धरून खरेदीखत न घेता आणि फेरफार न बनवता समाजकंटकाने सरोदे परिवाराचे घर पाडून भूमिहीन करून ५१ गुंठे जमीन बेकायदेशीर स्वतःच्या नावावर लावून घेतले आहे. त्यामुळे सदर गट नंबर १०२६ सातबारा वर माझ्या नावाची नोंद करून ताबा मिळावा व दोषींवर ४२० चा गुन्हा दाखल व्हावा ही मागणी १२ वर्षापासून अनेक वेळा करून अनेक वेळा उपोषण करूनही अनेक सुनावण्या होऊन अहिल्यानगर तालुका तहसीलदार साहेबांनी सदर प्रकरण निकालावर बंद करून अहिल्यानगर तहसीलदार तथा तालुका न्याय दंडाधिकारी न्याय (निकाल ) देत नसल्यामुळे पीडित कौसाबाई मारुती सरोदे व सरोदे परिवार हे दिनांक १६ जून २०२५ पासून जोपर्यंत न्याय देत नाही. तोपर्यंत अहिल्यानगर तालुका तहसील कार्यालयातच शेळ्या मेंढ्यांना घेऊन राहणार असल्याचे प्रतिक्रिया



देताना सरोदे परिवाराने व सरपंच यांनी सांगितले. या आंदोलन स्थळी पीडित कौसाबाई मारुती सरोदे व सरोदे परिवार, चिचोंडी पाटीलचे शरद पवार, अन्याय निवारण समितीचे अध्यक्ष अरुण रोडे पाटील व धनगर बांधव मोठ्या संख्येने तहसील कार्यालय येथे उपस्थित होते. या सर्वांनी तहसीलदार साहेब न्याय द्या, न्याय द्या. या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## चला शाळेत जाऊ उपक्रमाअंतर्गत आ. दातेंकडून विद्यार्थ्यांचे स्वागत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील विविध भागांत बरसणारा रिमझिम पाऊस, नवा गणवेश, नविन वह्या, नवीन पुस्तके, नवा वर्ग, नवे शिक्षक, नविन वर्गमित्र, सोबतीला विद्यार्थ्यांच्या उत्साह वाढविण्यासाठी शाळांमध्ये करण्यात आलेली फुलांची सजावट, गुलाबपुष्प व खाऊचे वाटप आणि सोबतीला विद्यार्थ्यांच्या स्वागताला विधानसभा सदस्य हे चित्र होते. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर, वारणवाडी आणि गुरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळांमधील.

यावेळी आमदार महोदयांच्या सोबत पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन ॲड.बाबासाहेब खिलारी, टाकळी ढोकेश्वर वि.का. सोसायटीचे चेअरमन बबनराव पायमोडे, डॉ.भाऊसाहेब खिलारी, मा.सरपंच शिवाजी खिलारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, काकणेवाडी गावचे सरपंच गिताराम वाळुंज, भगवान वाळुंज, दत्ता आहेर, संपत आहेर, अंकुश काशिद, अर्जून पिंगळे, नथु काशिद यांसह शिक्षक, विद्यार्थी, स्थानिक शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, नागरीक व पालकवर्गही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना आंनददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या उद्देशाने शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार आमदार काशिनाथ दाते सर यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर, वारणवाडी व गुरेवाडी येथे इयत्ता पहिलीतील नाव प्रविष्ट विद्यार्थ्यांचा शालेय प्रवेशोत्सव सोहळा संपन्न झाला. आमदार दाते यांनी नवप्रविष्ठ विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून



> शाळेचा पहिला दिवस १०० शाळा भेट उपक्रम शासनातर्फे राबविला जात असुन आजच्या या शाळा प्रवेशोत्सव उपक्रमामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाज यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होऊन राज्याच्या शैक्षणिक प्रगतीस मदत होईल.
>
> **- आ. काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

विद्यार्थ्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांशी संवाद ही साधला. यावेळी त्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात विद्यार्थ्यांना गणवेश, एक जोडी बूट, मोफत पाठ्यपुस्तके या शैक्षणिक साहीत्याचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे पहिले पाऊल वर्गात टाकून विद्यार्थ्यांचा प्रवेश करण्यात आला. तसेच प्रवेशोत्सवापुर्वी नवप्रविष्ठ विद्यार्थ्यांची गावातून शोभायात्रा ही काढण्यात आली.

## स्वातंत्र्य सेनानींच्या दरमहा २० हजार रूपये सन्मान निधीला कॅबिनेटची मंजुरी

### आ.मुनगंटीवार यांनी विधानसभेत वेधले होते लक्ष



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** आणीबाणीच्या काळात कुटुंबाचा आणि स्वतःचा जराही विचार न करता केवळ राष्ट्र सर्वोपरी म्हणून देशासाठी कारावास भोगून संघर्ष करणाऱ्या लोकतंत्र सेनानींना दरमहा २० हजार रुपये सन्मान निधी मिळावा, यासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून आवाज बुलंद केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निवेदनाच्या माध्यमातून मागणी केली होती. आज राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळेच हे शक्य झाले, या शब्दांत लोकतंत्र सेनानींनी त्यांचे आभार मानले आहेत. एका अत्यंत संवेदनशील विषयामध्ये स्वतः लक्ष घालून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पाठपुरावा केला. त्यानंतर ४ हजार १०३ लोकतंत्र सेनानींना न्याय मिळाला आहे. त्यामुळे आ. मुनगंटीवार यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. कॅबिनेटने दिलेल्या मंजुरीनुसार, एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीतील सेनानींना मासिक २० हजार रुपये व त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीला किंवा पतीला १० हजार रुपये इतके मानधन देण्यात येईल. तसेच एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीतील सेनानींना मासिक १० हजार रुपये तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीला किंवा पतीला ५ हजार रुपये इतके मानधन देण्यास कॅबिनेटने मंजुरी दिली आहे. लोकतंत्र सेनानींना मानधन मिळण्यात व इतर प्रशासकीय बाबींमध्ये येत असलेल्या अडचणींचे निवेदन आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले होते. विषयाची दखल घेऊन सरकारदरबारी पोहोचल्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केला. मंगळवार, दिनांक १७ जून २०२५ ला कॅबिनेटची मंजुरी मिळाल्यामुळे या प्रयत्नांना यश आलं आहे. लोकतंत्र सेनानी संघाचे (जालना, परतूर) कार्याध्यक्ष रघुनाथ दीक्षित, महासचिव विश्वास कुलकर्णी (जळगाव), प्रदीप ओगले (सांगली), अरुण भिसे (यवतमाळ), पांडुरंग जिंजुर्डे (यवतमाळ) आणि यादवराव गहूकार (यवतमाळ), श्रीकांत शिंदे (सांगली) यांनी आ.सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेत यासंदर्भातील निवेदन दिले होते.

## थोडक्यात




### कळंब आगाराकडून विद्यार्थ्यांना मोफत एस.टी पासचे वाटप

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.१७, धाराशिव :** कळंब आगार व्यवस्थापक एस.डी खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दिनांक १७ जून २०२५ रोजी सावित्रीबाई फुले विद्यालयात जाऊन अहिल्यादेवी होळकर वितरित योजनेअंतर्गत विद्यार्थीना मोफत एस.टी पासचे वाटप करण्यात आले. यावेळी वाहतूक निरीक्षक एन.आर.जाधव तसेच वाहतूक नियंत्रक सी.डी.गोसावी व ए.बी.सोनटक्के विद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

### रोहिणी लचके यांची नाशिक उन्नती महिला मंडळाच्या अध्यक्षपदी निवड



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** नाशिक संत नामदेव महाराज, विठ्ठल मंदिर सिडको व नाशिक शहर येथील संत नामदेव शिंपी समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळेमळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी विविध विषयाबरोबर महिला मंडळाची नूतन कार्यकारणीच्या सर्व सदस्यांच्या उपस्थितीत, उन्नती महिला मंडळाची नूतन कार्यकारणीची सार्थ निवड करण्यात आली. त्यावेळी सर्व सदस्यांच्या एकमताने आणि नाशिकचे सामाजिक कार्यकर्ते सुभाष लचके यांच्या वक्तृत्व, धडाडीचे व्यक्तिमत्व असलेल्या त्यांच्या सुनबाई रोहिणी लचके यांचे एक मताने अध्यक्षपदासाठी निवड करण्यात आली. नाशिक शिंपी समाजाच्या वतीने जेष्ठ उद्योगपती राहणे यांनी लचके यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या आणि या २०२५ च्या उन्नती महिला मंडळाची कार्यकारिणी अध्यक्षारोहिणी लचके, उपाध्यक्षा पूजा वारे, सचिव सोनल बोटवे, सहसचिव निलांबरी बकरे, खजिनदार दिपाली बकरे, सह खजिनदार अश्विनी वटारे, सदस्य प्रीती भांबारे, मेघा बकरे, स्वप्नाली सदावर्ते, कांचन बोढाई, माया अवसरकर, शिल्पा अवसरकर, पुनम भुसे, पुनम गायकवाड, शितल अवसरकर या सर्व महिला कार्यकारणीची नाशिक शिंपी समाज बांधवांनकडून शुभेच्छा देऊन गौरविण्यात येते आहे.

### रा.जि.प शाळा चिरनेर येथे 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात साजरा



**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.१६, उरण (रायगड) :** दिनांक १६ जून २०२५ रोजी रा.जि.प.शाळा चिरनेर येथे 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरी आणि घोषणांनी झाली. त्यानंतर शाळेत नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले. यांचे औक्षण करून 'शाळेतील पहिले पाऊल' हा विधी पार पडला. नंतर मुख्य कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी उपस्थितांचे आणि नवागतांचे स्वागत करण्यात आले. पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शूज आणि गणवेशाचे वाटप करण्यात आले. ज्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून नवागतांची नावनोंदणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता, बौद्धिक क्षमता आणि भाषा-गणन क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात आला. गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत आणि केंद्रप्रमुख श्री जाधव यांनी पहिलीत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. ज्यामुळे पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढवण्याचा संदेश देण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन सुरेश पाटील यांनी योग्यरित्या केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बळीराम पाटील यांनी केले. या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाली.

या कार्यक्रमाला चिरनेर गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये सरपंच भास्कर मोकळ, उपसरपंच अरुण पाटील, माजी सभापती शुभांगी पाटील, गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत, केंद्रप्रमुख श्री. जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे, उपाध्यक्षा आणि सर्व सदस्य, तसेच ग्रामपंचायत सदस्य यांचा समावेश होता, कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक विश्वनाथ गावंड यांनी करून सर्व शिक्षक वर्गाने त्यांची जबाबदारी योग्यरित्या पार पाडून सदर कार्यक्रमाची शोभा द्विगुणित केली.

### दापोली हर्णे मुख्य रस्त्यावर झाडाच्या मोठ्या फांद्या दुकानावर पडल्या

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१७, दापोली (रत्नागिरी) :** दापोली हर्णे मुख्य रस्त्यावरील ज्वाला बॅटरी व श्रेयस हॉटेल सी डी फर्निचर यांच्या पत्र्यावरती रस्त्याच्या लगत असलेल्या गुलमोहर वृक्षाच्या झाडाच्या मोठ्या फांद्या कोसळल्या होत्या. त्याच झाडाला लागून मधून एम एस सी बी ची लाईटची लाईन गेलेली आहे. तसेच रस्त्यावर उभी असलेली एक जीप बाजूला हटविण्यात आली त्या गाडीवर ही फांद्या कोसळल्या होत्या. नगरपंचायत प्रशासन घटनास्थळी जाऊन सदर झाडाची कटिंग करून फांद्या बाजूला काढण्याचे काम भर पावसात सुरू होते. रस्त्याला कोणतेही अडथळा आला नाही. परंतु नगरपंचायत प्रशासनाने अशा धोकादायक झाडांच्या फांद्या वेळोवेळी कटिंग करून घ्याव्यात. जेणेकरून मोठा अनर्थ टळला. काही ठिकाणी शाळेच्या बाजूला झाडे बरेच दिवस सुकले आहेत झाडांच्या फांद्या सुकल्या आहेत. अशा झाडाची अवस्था अतिशय बिकट आहे ते झाडे एम.एस.ई.बी च्या लाईन वर तसेच रस्त्यावर कोणाच्याही अंगावर कधीही केव्हाही पडू शकतात असे असून सुद्धा काही झाडे काढली जात नाहीत. याकडेही प्रशासनाने लवकरात लवकर लक्ष द्यावे.